INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# सबाल्टर्न इतिहास लेखन : एक दृष्टिकोन
# (Subaltern Historiography: A Perspective)

**प्रा.डॉ.आर.ए. चव्हाण**
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड.
E-mail: rchavan1972@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/03.2025-58286427/IRJHIS2503032

**प्रस्तावना :**

आजपर्यंत आपण इतिहासाकडे पाहण्याचे काही पूर्वपार चालत आलेले दृष्टिकोन पाहिले. आता आपल्याला अलीकडील नवा इतिहास विषयक दृष्टिकोन पहावयाचा आहे. आधुनिक काळात इतिहास हे एक सामाजिकशास्त्र म्हणून विकसित झाले आहे. 'निवळ घटनांचा तपशिल गोळा करून त्यांची कालानुक्रमे मांडणी केली पाहिजे म्हणजे इतिहास' ही कल्पना आता मागे पडली आहे. घटिताना बोलते करून त्यांच्यापासून निष्कर्ष काढण्याचे काम इतिहासकाराला करावे लागत. घटिते हा इतिहासाचा कच्चा माल आहे असे म्हटल्यास गैर ठरणार नाही. ज्या घटना समाजाच्या पृष्टभागावर दिसतात त्यांच्या मुळाशी वेगवेगळे कार्यकारणभाव दडले असल्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या गटांचे हितसंबंधसुध्दा या घटितामधून दिसून येतात. पुढे येणाऱ्या घटितांना प्रश्न विचारल्याशिवाय त्यांची उत्तरे मिळू शकत नाहीत. प्रत्येक घटनेमागे एक विचार असतो तो विचार त्या काळातील विचारप्रणालींनी व भौतिक परिस्थितीने प्रेरित असतो. अशा विचारांचे विश्लेषण करणे ही काळाची गरज असते. भारतीय समाजातील जात, वर्ग, जातीविरोधी चळवळी, सामाजिक, धार्मिक चळवळी, ब्राह्मणेत्तर चळवळ यांच्यावर इतिहासकारांनी योग्य प्रमाणात लक्ष केंद्रित केले नाही. हे लिखान पुरूष प्रधान लेखनच आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मतुआपंथ, नामशुद्र चळवळ, स्वाभिमान चळवळ यांचा विचार आजपर्यंतच्या लेखनामध्ये झालेले नाही.

**सबाल्टर्न विचार प्रवाहाचा उदय :**

दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या इतिहासाचा अभ्यास व्यापक संदर्भात झाला. ह्या प्रदेशावर द्वितीय महायुध्दपूर्वी कित्येक वर्षे वसाहतीवर पाश्चात्य राष्ट्रांचे शासन होते. त्या दीर्घ काळावधीत स्थानिक लोकांनी अनेकदा परकीय शासनाविरोधी उठाव केला त्यात जनसामान्याचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. परंतु इतिहासलेखनातून त्यांच्या सहभागांचा / कामगिरीचे यथार्थ दर्शन घडविले गेलेले नाही; संशोधन व लिखान करण्याच्या हेतुने Center of South Asian Cultural Studies ह्या संस्थेची पायाभरणी करण्यात आली. भारतातील इतिहास अभ्यासकाची सामुहिकरित्या जाणीवपूर्वक इतिहास क्षेत्रात नव्या प्रयोगाचे पर्व सुरू केले. १९८२ साली 'सबाल्टर्न स्टडीज' ह्या शिर्षकाचा डॉ. गुहांनी संपादित केलेला एक लेखसंग्रह प्रकाशित झाला. समविचारी अभ्यासकांनी एकत्र

येऊन असा सामुहिक उपक्रम सुरू करण्याचा इतिहास क्षेत्रांतील हा अभिनव प्रयोग होय. डॉ. रणजित गुहा यांनी पुरस्कृत केलेल्या सबाल्टर्न प्रवाहाचा तात्विक आधार अन्तोनिओ ग्रामची हा होय.[१]

**अन्तोनिओ ग्रामची :**

ग्रामची हा इटालियन मार्क्सवादी विचारवंत म्हणून प्रख्यात आहे. पहिल्या महायुध्दानंतर इटालीत कामगारांच्या लढ्याचे आयोजन व नेतृत्वही त्याने केले. इटालित मुसोलीनीच्या उदयानंतर त्यांच्या हुकूमशाही शासनावर प्रहार करणारे अनेक अभ्यासपूर्ण लेख त्याने लिहिले. त्यामुळे १९२६ साली त्याला अटक होऊन दिर्घ कारवासाची शिक्षा झाली. कारागृहात राजबध्यांशी इटालीतील राजकीय बंदिवासातच अन्तोनिओचे निधन झाल्यानंतर काही वर्षानी १९५० नंतर त्याचे लिखान Selections from political writings आणि selections from prison notebooks ह्या शीर्षकाखाली प्रकाशित झाले. आर्थिक व्यवहार सामाजिक जीवनाला आधारभूत असेल तरी त्यावरील सांस्कृतिक देखील तितकाच महत्वाचा असतो. सामाजिक परिवर्तनाला संस्कृती गती देते व दिशा देते असा सिध्दांत ग्रामची मांडतो.[२]

ब्रिटिश इतिहासकार ई.पी. थॉम्पसन यांचे इतिहास लेखन सबाल्टर्न इतिहासकारांचे प्रारंभिक प्रेरणास्त्रोत ठरले. सबाल्टर्न या संज्ञेची व्याख्या अशोक सेन यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या पाचव्या अंकातील आपल्या Capital class and community या लेखात "The term subaltern is used to denote the entire people that is subordinate is term of class, cast, age, gender and office or in any other way" म्हणजेच सबाल्टर्न च्या कक्षेत समाजातील वंचित, पददलित, शोषित, दुर्लक्षित समूहाचा अंतर्भाव होतो.[३]

ग्रामचीने वैचारिक प्रभुत्वाची किंवा अधिसत्तेची Hegemony संकल्पना मांडून नवमार्क्स वाद मांडला अभिजन वर्गाचे (Elite class) वैचारिक प्रतिनिधी संकल्पनाचे सामाजिक संबंधाचे एक जाळे तयार करतात याला ग्रामची अधिसत्तेची धुरिणत्व अथवा वैचारिक प्रभुत्व मानतो. आधीसत्ता अधिराज्य दोन मार्गाने निर्माण करतो १) राजकीय मार्ग २) सांस्कृतिक मार्ग राजकीय मार्गामध्ये आर्थिक व दंडशक्तीमार्फत दमण केले जाते. सांस्कृतिक मार्गामध्ये वैचारिक, नैतिक संस्थामार्फत आपले प्रभुत्व सांस्कृतिक विश्वास निर्माण करतात. या मार्गाला नागरी समाजाची संमती असते. बुद्धिवंतांमध्ये पारंपारिक बुद्धिवंत सेंद्रिय (organic) बुद्धिवंत असे भेद असतात. या दोन वर्गांमधील सेंद्रिय बुद्धिवंतांच्या क्रांतिकारी भूमिकेवर ग्रामचीने जोर दिला आहे. वर्गसंघर्ष हा बुद्धिवंतांच्या गटातील संघर्ष असतो.[४]

ग्रामचीची सबाल्टर्न संकल्पना स्थूल व लवचिक असली तरी त्यामध्ये संदीग्धता नाही. शोषित असणारे आणि प्रभुत्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेतील अंकितता पत्करलेले जनसमूह असा अर्थ त्यातून प्रगट होतो. आर्थिक उत्पादनाच्या घडणाऱ्या विकासाच्या व बदलांच्या संदर्भात सबाल्टर्न समाज गटांच्या निर्मितीची प्रक्रिया शोधण्याची ग्रामचीने केलेली सूचना नागरी समाजातील वर्चस्व/ प्रभुत्व संबंधाबरोबर शोषक संबंधांचा अभ्यास करण्याचा आग्रह कायम ठेवते. या पार्श्वभूमीवर सबाल्टर्न संकल्पनेचे भाषांतर 'शोषित अंकितजन' असे करणे अधिक उचित ठरू शकते. गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सबाल्टर्न' या संकल्पनांचा केलेला स्वीकार त्यांच्या इतिहास प्रकल्पाचे सामर्थ्यस्थान आहे. परंतु भारतीय संदर्भात त्यांनी लावलेला सबाल्टर्न संज्ञेचा अर्थ गोंधळ वाढवणारा व अपुरा आहे. भारतातल्या शोषण शासनाच्या व्यवस्थेची व्याभिघ्रता अधोरेखित करून सबाल्टर्नची व्याख्या करण्याऐवजी स्थानिक अभिजनांचे कुंपणावरचे संदीग्ध स्थान यास त्यांनी व्याख्येसाठी महत्त्वाचे मानले. वर्गव्यवस्था, जाती व्यवस्था, पितृसत्तेचे भारतीय समाजातील शोषणाची व वर्चस्वाची विशिष्टता घडवली आहे. अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रीय पातळीवरच्या अभिजनांना मदत करणारे स्थानिक अभिजन हे अभिजन व मदत न करणारे ते सबाल्टर्न अशी व्याख्या संदीग्ध व

गोंधळ वाढविणारीच ठरते. जातीव्यवस्थेमुळे अन्याय शोषित अंकितांमध्ये शोषणाचे व वर्चस्वाचे संबंध उतरंडीच्या स्वरूपात कार्यरत राहतात. त्यामुळे सर्व शोषित अंकितांना सबाल्टरर्नचा एकच सामाजिक कोटीमध्ये उभे करणे गोंधळाला आमंत्रण देणारेच ठरते.[५]

**सबाल्टर्न इतिहासलेखनातील आशय :**

सबाल्टर्न इतिहासाचे चार खंडांचा अभ्यास केल्यानंतर या विचारांचे नेमके स्वरूप लक्षात येते. आत्तापर्यंतच्या इतिहासलेखनात ज्या घटकांचे पूर्णतः दुर्लक्ष झाले अशावरील लेखनाचा समावेश या इतिहासात झाला आहे. दक्षिण गुजरात मधील आदिवासींच्या उठावाविषयी म्हणजेच १९२२-२३ च्या देवी चळवळीविषयी डेव्हिड हार्डीमन यांनी अत्यंत विस्ताराने शोध घेतला आहे. १८७६ ते ७८ या काळात मद्रासमध्ये प्रचंड दुष्काळ पडला होता. या दुष्काळात सामान्य शेतमजुरांच्या प्रयत्नांचा शोध डेव्हिड अर्नोल्ड यांनी घेतला आहे. रामचंद्र गुहा यांनी ब्रिटिश कुमाऊतील सामाजिक उद्रेक रेखाटलाय तर स्वप्नदास गुप्ता मिदनापूर येथील आदिवासीचे राजकारण समजून घेत होते. १८५८ च्या चार अज्ञात बंडखोरांचा शोध गौतम भद्र यांनी घेतला आहे. वसाहती कालखंडातील मद्रास प्रेसिडेन्सी मध्ये नोकर भरती कशी होती. शिपाई भरतीचे निकष काय होते याचे सविस्तर विवेचन या ग्रंथात आलेले आहे. रणजित गुहांचा एक लेख यात आहे. चंद्राज डेथ या नावाचा लेख आहे. पूर्व गुजरातमधील भिल्ल आणि सावकार यांचे संबंध संघर्ष यावरही लेख यात समाविष्ट आहे लेखावरील दृष्टिक्षेप ही गोष्ट स्पष्ट करते की, अत्यंत विस्तृत अशा विषयावर आत्तापर्यंत दुर्लक्षिलेल्या मुद्द्यांवर सबाल्टर्न इतिहासाने भर दिला आहे. असाच शोध महाराष्ट्रातील समाजातूनही घेता येऊ शकेल. तो शोध घेण्याची प्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुलेंनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात सुरू केली होती. ती पुनर्जीवित करून सामान्यांच्या इतिहासाचा शोध घेतला पाहिजे. तसे झाले तरच खऱ्या अर्थाने इतिहास हा सामान्यांचा समग्र वाटचालीचा आलेख ठरेल.[६]

**सबाल्टर्न इतिहासलेखनाचे स्वरूप :**

सबाल्टर्नवादी इतिहासकारांनी सबाल्टर्न जाणीव केंद्रस्थानी ठेवून इतिहास लिहिण्याचा उद्देश आपल्यापुढे ठेवला आहे. अभिजनवादी वर्गाच्या पुढाकाराने राजकीय प्रतिकाराची चळवळी घडलेल्या नाहीत असे सबाल्टर्नवादी लोकांचे मत आहे. म्हणून सबाल्टर्न हे इतिहासाचे कर्ते बनले आहेत. सबाल्टर्न चळवळी वाढत्या शोषणाविरूद्ध झाल्या अशी त्यांची भूमिका आहे. त्यांचा विरोध अधिसत्तेची केंद्रे व प्रतिके यांच्यावरील हल्ल्यातून स्पष्ट होतो. सबाल्टर्न जाणीव ही स्वायत्त (Suigenetis) असते अशी ही भूमिका आहे. सामंती सत्तापद्धती, भांडवली सत्तापद्धती व समुदाय सत्तापद्धती यांचे विवेचन करून समुदाय सत्ता पद्धतीचा वापर सबाल्टर्नने केला आहे. सबाल्टर्न इतिहासकारांनी मानववंशशास्त्र, संरचनावादी, उत्तर-संरचनावादी, भाषाशास्त्र व ज्ञान सत्ता संबंध इ. पद्धतीचा अभ्यास इतिहासलेखनात केला आहे.[७]

**निष्कर्ष :**

१) अन्तोनिओ ग्रामचीची हेजिमनीची संकलपना सबाल्टर्न लेखनामागील प्रेरणा मानली जाते.

२) दुर्लक्षित राहिलेल्या विषयांकडे अभ्यासकांनी लक्ष आकर्षित केले.

३) दुर्लक्षित समाज गटांना इतिहासात स्थान मिळवून दिले.

**सारांश :**

सबाल्टनर्स इतिहासलेखनाची चिकित्सक समीक्षा केल्यास परंपरागत इतिहास लेखनातून वेगळा असलेला त्या इतिहासलेखनाला आव्हान देणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण वैचारिक धारणेतून जन्माला आलेल्या ह्या इतिहास लेखन प्रवाहाचे स्वरूप

निश्चितच मौलिक आहे असे निदर्शनास येते. इतिहासलेखनातील एक धाडशी अभिनव प्रयोग आहे. आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विषयाकडे अभ्यासकांचे लक्ष त्याने आकर्षित केले आहे. परंपरागत स्त्रोतसाधने तुटपुंजी असून देखील गैरपारंपारिक साधनांच्या चिकित्सक विश्लेषण करून त्याचे सप्रमाण इतिहासलेखन केले आहे. लहान समाज गटांचा लहान प्रदेशातील घडामोडीचा इतिहास त्याने शब्दबध्द केला आहे. समाजातील अंतररचनेत दडपलेल्या शक्ती प्रवाहांचा, सत्ताकेंद्राचा, त्यांच्या सामाजिक जीवनावरील प्रभावाचा विचार त्याने केला. महाराष्ट्रापूरता विचार करावयाचा तर, पारंपारिक दृष्ट्या इतिहासलेखन नसले तरी महात्मा ज्योतीबा फुले यांचे साहित्य वंचित जनसमुहांच्या समस्यांना, त्यांच्या शोषणाला त्यांच्या शब्दात, त्यांच्या भूमिकेतुन वाचा फोडणारे या दृष्टीने सबाल्टर्न ह्या संज्ञेखाली येऊ शकते. म. फुले यांनी वंचित गटात दलित समुहाबरोबर शेतकरी, कामगार व महिला यांचाही अतर्भाव केला आहे. हे विशेषकरून लक्षणीय ठरते.

**संदर्भ सूची :**


१) Sarkar Sumit, Writing Social History, Oxford University Press, Delhi, 2011, P.No.82

२) डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २ ऑक्टोबर २००५, पृ.क्र. २४०

३) डॉ. गाठाळ एस.एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स, छत्रपती संभाजीनगर, प्रथम आवृत्ती, २०१५, पृ.क्र. २६६

४) डॉ. सरदेसाई बी.एन., इतिहासलेखन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, जानेवारी २००५, पृ.क्र. १८८

५) समाज प्रबोधन पत्रिका आणि सेंटर फॉर स्टडीइन कल्चर अँड सोसायटी, इतिहासलेखन मीमांसा, हायर एज्युकेशन सेल, मुंबई, पहिली आवृत्ती, मार्च-२०१०, पृ.क्र. ८०

६) डॉ. देव प्रभाकर, इतिहास एकशास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, ०१ जानेवारी -२००२, पृ.क्र. ५१३

७) डॉ. सरदेसाई. बी.एन., (उपरोक्त), पृ.क्र. १८९